जा. क्र .सासंमं २०२३/ २६२९
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाटय मंदिर इमारत, दुसरा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५
दिनांक :- ०८/०८/२०२३

स्वीय सहायक
सचिव, मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२

## कार्यालयीन आदेश

संदर्भ :- महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : मकचौ- २०१३/प्र.क्र.६३/मकक दिनांक १९ जून, २०१४

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण ) अधिनियम - २०१३ व दि. ९/१२/२०१३ च्या नियम अधिनियमातील तरतूदीनुसार तक्रारींची चौकशी करण्यासाठी या कार्यालयात खालीलप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठित करण्यात येत आहे :-

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मीनाक्षी रा. पाटील | सचिव | अध्यक्ष |
| २ | श्री. प्र. ना.मोरे | ग्रंथालयीन सहायक | सदस्य |
| ३ | श्रीमती स्वा.सु. केसरकर | वरिष्ठ - लिपिक | सदस्य |
| ४ | श्रीमती तृप्ती पांचाळ | प्रोजेक्ट कॉर्डीनेटर - टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, देवनार, मुंबई - ४०००८८ | सदस्य |

कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी लैंगिक छळासंदर्भात कोणतेही तक्रार असल्यास अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्षांच्याकडे किंवा सदस्याकडे तात्काळ सादर करावी.

अंतर्गत तक्रार समितीचे कामकाज पुढीलप्रमाणे चालेल :-

१. सर्वोच्च न्यालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महिलांच्या लैंगिक छळवणुकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.
२. विभागाच्या स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारींची छाननी करून त्यांचे निवारण निर्धारित कालावधीमध्ये करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिकऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे.
३. लैंगिक छळवणुकीसारखे प्रकार टाळण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम घेणे तसेच समितीच्या नियतकालिक बैठकीत त्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे.
४. राज्य माहिला तक्रार निवारण समितीस याबाबत वेळोवेळी अहवाल सादर करणे.
५. सदर समितीचा कालावधी कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्ष राहील.

निर्गमित दिनांक
०८/०८/२०२३

(मीनाक्षी रा.पाटील)
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रत माहितीस्तव :-

मा. सचिव, मराठी भाषा विभाग, नवीन प्रशासन भवन, ९ वा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांना प्रत माहितीस्तव सविनय सादर

प्रति,

१) अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण समिती, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२) श्रीमती तृप्ती पांचाळ, प्रोजेक्ट कॉर्डीनेटर - टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, देवनार, मुंबई - ४०००८८
३) सदस्य, अंतर्गत तक्रार निवारण समिती
४) निवड फाईल